अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड । शुक्रवार
२५.०९.२०२६
वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: २३७ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

## थोडक्यात

### ११ वर्षांत दुष्काळाचा सातवा फेरा : यंदा दुष्काळाची परिस्थिती अतिभीषण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – कधी अतिवृष्टी, तर कधी दुष्काळ अशा नैसर्गिक संकटाचा सामना करणाऱ्या महाराष्ट्राला गेल्या ११ वर्षात सात वेळा दुष्काळाचा सामना करावा लागला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात पाच वेळा, तर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना एकदा राज्याला दुष्काळ अथवा दुष्काळसदृश परिस्थितीशी झुंजावे लागले आहे. यंदा दुष्काळ जाहीर झाल्यास तो ११ वर्षांतील सातवा दुष्काळ ठरणार आहे. सन २०१५-१६ या वर्षात पावसाची गंभीर स्वरूपाची कमतरता जाणवून पाणीटंचाई निर्माण झाली होती.

# संयुक्त राष्ट्र महासभेत तब्बल ७५ देशांचा इस्त्रायली पीएम नेतान्याहूंवर बहिष्कार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी संयुक्त राष्ट्र महासभेत भाषण दिले. ते मंचावर येताच, ७५ देशांच्या प्रतिनिधींनी त्यांची खिल्ली उडवली आणि ते बाहेर निघून गेले. यानंतर नेतान्याहू सुमारे तीन मिनिटे शांतपणे उभे राहिले. मग ते म्हणाले, 'मी माझे भाषण सुरू करण्यापूर्वी सांगू इच्छितो की, जर येथे आणखी कोणी भ्याड असतील, तर कृपया निघून जा.' मात्र, प्रेक्षक गॅलरी नेतान्याहूंच्या समर्थकांनी भरलेली होती. त्यांनी टाळ्या वाजवून त्यांचे स्वागत केले आणि 'आम यिस्रायल चाय' (म्हणजे 'इस्रायलचे लोक चिरायू होवोत') अशी घोषणाबाजी केली. भाषणात नेतान्याहू यांनी गाझा, इराण आणि लेबनॉनमधील इस्रायली कारवाईचा उल्लेख केला. त्यांनी ट्रम्प यांची प्रशंसा केली आणि न्यूयॉर्कचे महापौर ममदानी व युरोपीय नेत्यांवर टीका केली.

इस्रायली लष्करी हल्ल्याचे समर्थन नेतान्याहू यांनी ७ ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या हल्ल्याचा संदर्भ देत इस्रायलच्या लष्करी कारवाईचे समर्थन केले. ते म्हणाले की, हमासच्या दहशतवाद्यांनी ज्या प्रकारे इस्रायली नागरिकांना ठार मारले ते भयंकर होते. अशी भीषणता अकल्पनीय आहे. नेतान्याहू पुढे म्हणाले, 'शत्रूंना वाटले होते की इस्रायल कोसळेल, पण तसे झाले नाही. आम्ही उठून सिंहासारखे लढलो.' इस्रायलच्या पंतप्रधानांनी गाझामध्ये इस्रायलने नरसंहार केल्याचा आरोप फेटाळून लावला. नेतान्याहू म्हणाले, 'इस्रायलने नरसंहार केला नाही. इस्रायलने नरसंहार रोखला. जर हमास समर्थकांना संधी मिळाली असती, तर त्यांनी प्रत्येक ज्यूला ठार मारले असते.'

न्यूयॉर्कच्या महापौरांना हमास समर्थक म्हटले त्यानंतर त्यांनी न्यूयॉर्कचे महापौर झोहरान ममदानी यांना लक्ष्य केले. नेतान्याहू म्हणाले की, जगातील सर्वात मोठी ज्यू लोकसंख्या असलेल्या या शहरात ज्यूंना आता सुरक्षित वाटत नाही. त्यांनी ममदानी यांना हमास समर्थक म्हटले.

## नेपाळ थरकापाची आता सिक्कीममध्ये पुनरावृत्ती

# भूस्खलनात २० हून अधिक घरे अन सरकारी क्वार्टर्स वाहून गेल्या

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**रिम्बी** – सिक्कीमच्या ग्यालशिंग जिल्ह्यातील रिम्बी गावात गुरुवारी रात्री मुसळधार पावसामुळे झालेल्या भूस्खलनात २० हून अधिक घरे आणि सरकारी निवासस्थाने वाहून गेली. मात्र, आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले अर्णब चक्रीवादळ कमकुवत झाले आहे. यामुळे ओडिशामध्ये मुसळधार पाऊस, अचानक येणारे पूर आणि भूस्खलनाचा धोका निर्माण झाला आहे. गुरुवार दुपारपर्यंत ८,०८२ लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले होते. या चक्रीवादळाचा नऊ राज्यांना फटका बसला आहे. पुढील २४ तासांत छत्तीसगड, किनारपट्टीवरील आंध्र प्रदेश, ओडिशा आणि तेलंगणामध्ये अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. या भागात मेघगर्जनेसह ५०-६० किमी प्रतितास वेगाने सोसाट्याचा वारा वाहू शकतो.

मध्य प्रदेशात एक शक्तिशाली प्रणाली सक्रिय झाली आहे. जबलपूरसह १३ जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. १६ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. आज बिहारमधील १९ जिल्ह्यांमध्ये पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. हरियाणात यमुनानगर, कर्नाल आणि पानिपतसह सहा जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. दरम्यान, उत्तर प्रदेशात मान्सून पुन्हा सक्रिय झाला आहे. आज सकाळपासून लखनौ, कानपूर, उन्नाव, वाराणसी, प्रयागराज आणि जौनपूरसह २० शहरांमध्ये पाऊस सुरू आहे. लखनौमध्ये गुरुवार संध्याकाळपासून सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस पडत आहे. चमोलीमध्ये हिमवृष्टीसह भूस्खलन, वाहने गाडली दरम्यान, उत्तराखंडमध्ये मान्सून पुन्हा सक्रिय झाला आहे. डेहराडून आणि हरिद्वारमध्ये अधूनमधून पाऊस पडत आहे. काल रात्री उशिरा झालेल्या मुसळधार पावसामुळे हरिद्वारमधील हर की पौरी घाट ओस पडले, त्यामुळे यात्रेकरूंना आश्रय घ्यावा लागला.

चमोलीतील कर्णप्रयाग-गैरसैन महामार्गावर झालेल्या भूस्खलनामुळे रस्ता बंद झाला आणि एक स्कूटर ढिगाऱ्याखाली गाडली गेली. दरम्यान, बद्रीनाथ-सतोपंथ मार्गावरील चक्रतीर्थ परिसरात जोरदार हिमवृष्टी झाली. एक स्कूटरस्वार भूस्खलनातून थोडक्यात बचावला. हवामान विभागाने आज नैनिताल, चंपावत आणि उधम सिंग नगरच्या काही भागांत मुसळधार पावसासाठी यलो अलर्ट जारी केला आहे.

# एमपीएससी औषध निरीक्षक पेपरफुटी प्रकरणात मोठी कारवाई

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## * मुंबई गुन्हे शाखेकडून आणखी ४ जणांना अटक, आरोपींचा आकडा ११ वर




**मुंबई** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक परीक्षा पेपरफुटी प्रकरणात मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत आणखी चार आरोपींना अटक केली आहे.

सांगोला, बुलढाणा आणि नवी मुंबईतून चौघे ताब्यात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या उमेदवारांमध्ये साजिद संदे याला सांगोला येथून तर विजय किंगर याला बुलढाणा येथून ताब्यात घेण्यात आले आहे.

तसेच या प्रकरणात मध्यस्थाची भूमिका बजावणाऱ्या संदीप खलाटे आणि भैरवनाथ कदम या दोघांना नवी मुंबई परिसरातून अटक करण्यात आली आहे.

याआधी 'या' आरोपींना अटक या प्रकरणाचा तपास करत असताना याआधी अवर सचिव अभिजीत लेंडवे, गोपनीय कक्षात काम करणारा सहाय्यक कक्ष अधिकारी विश्वेश्वर नकाते, सहाय्यक कक्ष अधिकारी गोपाळ मराठे, कौटिल्य अकॅडमीचे संचालक प्रवीण पाटील यांच्यासह मध्यस्थ अमृत पाटील, लोकेश उर्फ गौरव पाटील आणि उमेदवार ऋतुजा पाटील यांना अटक करण्यात आली होती.

# वर्ध्यात १९ वर्षीय तरुणीवर सामूहिक अत्याचार : ऑटोचालकांसह ५ आरोपी गजाआड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

## पीडितेच्या ओळखीवरून रेल्वे पोलिसांनी ५ आरोपींना अटक




**वर्धा** – पीडित तरुणी चंद्रपूर येथे तिच्या नातेवाईकांकडे गेली होती. तेथून परत येत असताना ती आधी सेवाग्राम आणि त्यानंतर वर्धा स्थानकावर पोहोचली. वर्धा: महाराष्ट्रातील वर्धा येथून एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे.

येथे एका १९ वर्षीय तरुणीवर सामूहिक अत्याचार करण्यात आल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी रेल्वे पोलिसांनी तातडीने कारवाई करत ऑटो चालकांसह ५ जणांना अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी चंद्रपूर येथे तिच्या नातेवाईकांकडे गेली होती. तेथून परत येत असताना ती आधी सेवाग्राम आणि त्यानंतर वर्धा स्थानकावर पोहोचली. मात्र, ती वर्ध्यात पोहोचली तोपर्यंत खूप उशीर झाला होता.

पीडितेने दिलेल्या माहितीनुसार, ही घटना २४ तारखेच्या मध्यरात्री २ ते ३ वाजण्याच्या सुमारास घडली. तरुणी स्थानकावर असताना एका ऑटो चालकाने तिला बस डेपोमध्ये सोडण्याच्या बहाण्याने बाहेर नेले. त्यानंतर तिथे उपस्थित असलेल्या दोन जणांनी तिच्यावर अत्याचार केला.

**दुसऱ्यांदाही तरुणीला बनवले शिकार**

या घटनेनंतर पीडित तरुणी कसाबसा धीर धरून पुन्हा स्थानकावर पोहोचली. मात्र, काही वेळातच काही जण पुन्हा आले आणि तिला जबरदस्तीने परत घेऊन गेले. यावेळी पहिल्यांदा अत्याचार करणारे आरोपीही त्यांच्यासोबत होते. पीडितेच्या दाव्यानुसार, तिच्यावर एकूण ५ ते ६ जणांनी सामूहिक अत्याचार केला.

**पोलिसांची कारवाई आणि ५ आरोपींना अटक**

या भयानक प्रकारानंतर पीडितेने तात्काळ पोलिसांत तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. या घटनेबाबत माहिती देताना रेल्वे पोलीस अधीक्षक मंगेश शिंदे यांनी सांगितले की, पीडितेच्या तक्रारीवरून आणि तिने केलेल्या ओळखीच्या आधारे पोलिसांनी त्वरित कारवाई करत ५ आरोपींना अटक केली आहे.

अटक करण्यात आलेल्यांमध्ये काही ऑटो चालक आणि त्यांच्या मित्रांचा समावेश आहे. पीडितेने ज्या आरोपींची ओळख पटवली होती त्या सर्वांना अटक करण्यात आली असून, पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा पुढील सखोल तपास करत आहेत.

### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -१५६९४६ रु.(१०ग्रॅम)


२२.कॅ सोने -१४४७१५ रु.(१०ग्रॅम)

चांदी - २,४५,००० रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

**बाजारभाव ( क्विंटलमध्ये )**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी - | १६५० - | २००० |
| गहू - | २५०० - | ३००० |
| तूर - | ६१०० - | ६३९० |
| मूग - | ६५०० - | ७००० |
| उडीद - | ६००० - | ७००० |
| हरभरा - | ५६०० - | ५९०० |
| सोयाबिन - | ४१०० - | ४३५० |
| बाजरा - | २००० - | २३०० |
| तिळ - | ८२०० - | ९३०० |
| भुईमूग - | ५१५० - | ५३५० |






# मुंबई-पुणे खासगी बसला भीषण आग एक्स्प्रेस-वेवर : एसीच्या वायरिंगमध्ये शॉर्टसर्किट, १४ प्रवाशांसह चालक सुखरूप

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**पनवेल** – राजस्थानातील उदयपूरहून पुण्याकडे जाणाऱ्या खासगी बसला मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वेवर गुरुवारी सकाळी भीषण आग लागली. सुदैवाने चालकाने प्रसंगावधान राखत



बस थांबवून १४ प्रवाशांना वेळीच बाहेर काढल्याने मोठी दुर्घटना टळली. या आगीत संपूर्ण बस जळून खाक झाली. एसीच्या वायरिंगमध्ये झालेल्या शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. उदयपूरहून पुण्याकडे जाणारी बस सकाळी सुमारे ७.२५ वाजता रसायनीजवळ आली असताना बसच्या एसीच्या वायरिंगमधून धूर येत असल्याचे चालकाच्या लक्षात आले.

# शाळा क्र.२ मधील धोकादायक अवस्थेत असलेले जलकुंभ पाडा

## नगरसेवक विशाल सावरकर यांच्या नेतृत्वात मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – येथील मलकापूर परिसरातील नगरपरिषद शाळा क्र.२ मधील ५० वर्ष पुरातन जलकुंभ अत्यंत जिर्ण व धोकादायक अवस्थेत आहे. त्यामुळे त्याचा काही भाग कधीही खाली कोसळुन मोठी दुर्घटना या परिसरात घडु शकते. त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष द्यावे, या मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.गटाचे) नगरसेवक विशाल सावरकर यांच्या नेतृत्वात मुख्याधिकारी यांना देण्यात आले.

विशाल सावरकर यांनी निवेदनात नमुद केले की, सदर जिर्ण अवस्थेत असलेला जलकुंभ न.प.शाळेच्या प्रांगणात असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. दररोज विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी येथुन ये-जा



करतात. जलकुंभाची सद्य:स्थिती लक्षात घेता जलकुंभाचा काही भाग कधीही खाली कोसळुन मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जिवितास धोका निर्माण होऊ शकतो. नगरपरिषदेकडुन पाणीपुरवठा योजनेंतर्गत शहरात नवीन जलकुंभाची निर्मिती करण्यात आली आहे. त्या जलकुंभातुन जल प्रवाहीत करुन शहराचा जलपुरवठा सुरळीत सुरु करावा.

### स्ट्रक्चरल ऑडिटनंतर जुनी पाण्याची टाकी पाडण्याची प्रक्रिया सुरू

"नगरपरिषद शेंदुरजनाघाट अंतर्गत सुरू असलेल्या वाढीव पाणी पुरवठा योजनेअंतर्गत मलकापूर विभागास पाणीपुरवठा करणारी टाकी झालेल्या स्ट्रक्चरल ऑडिट नुसार पाडण्याकरिता प्रस्ताव ति आहे, परंतु या जुन्या टाकीवरील संपूर्ण पाईपलाईन यंत्रणा नवीन बांधलेल्या दहा लक्ष लिटर क्षमतेच्या टाकीद्वारे योग्य दबावांनी पाणीपुरवठा करण्याचे काम मात्र सदर योजनेच्या कंत्राटाने पूर्ण केली नाही वाढीव पाणीपुरवठा योजना बांधकाम विभागामार्फत सुरू असल्याने पाणीपुरवठा विभागाने संबंधित विभाग व संबंधित कॉन्ट्रॅक्टरला वारंवार तोंडी व लेखी कळिवले आहे परंतु तरीही काम होत नसल्याने नवीन नगरपरिषद सदस्यांनी झालेल्या पहिल्या सर्वसाधारण सभेद्वारे देखील टाकी पाडणे आवश्यक असल्याचा ठराव पाणीपुरवठा विभागांनी मांडला असता ठराव मंजूर देखील झालेला आहे तरी जुन्या टाकीवरील संपूर्ण यंत्रणा नवीन टाकीवर हस्तांतरित झालेली नसल्याने नाईलाजास्तव मलकापूर विभागाचा पाणीपुरवठा खोळंबू नये म्हणून जुन्या टाकीवरुन पाणीपुरवठा करावा लागत आहे तरी लवकरच जुन्या टाकी वरील पाणीपुरवठा नवीन टाकीवर जोडून जुनी पाण्याची टाकी लवकरात लवकर पाडण्याची प्रक्रिया बांधकाम विभागमार्फत सुरू आहे.

**–पाणीपुरवठा अभियंता नगरपरिषद शेंदुरजनाघाट**

विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता संबंधित अधिकाऱ्यांनी या जिर्ण झालेल्या जलकुंभाची पहाणी करावी. जलकुंभ धोकादायक परिस्थितीत असल्यास परिसर सुरक्षित करुन विद्यार्थ्यांचा प्रवेश त्या भागात प्रतीबंधीत करावा. सदर जलकुंभ ५० वर्ष पुरातन असल्याने पाडण्याची परवानगी द्यावी. विद्यार्थ्यांच्या जिवितास कोणताही धोका निर्माण होऊ नये यासाठी आवश्यक ती प्रतीबंधक कार्यवाही तातडीने पुर्ण करावी.

यापुढे जिर्ण अवस्थेत असलेला जलकुंभ कोसळून कुठलीही दुर्दैवी दुर्घटना घडल्यास याला संबंधित प्रशासन व सत्ताधारी जबाबदार राहतील असा इशारा सुद्धा विशाल सावरकर यांनी दिला आहे. निवेदन देते वेळी विरोधी पक्षाचे गटनेते संदीप खडसे, नगरसेवक शेख नासीर शेख बबलु यांच्यासह राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'जल्दी बोल, कल सुबह पनवेल निकलना है'

## विद्यार्थ्याच्या वक्तव्यावर प्राध्यापक संतापले

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**अहमदाबाद** – अहमदाबाद मधील निरमा विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या स्टँड-अप कॉमेडी शोदरम्यान घडलेल्या एका प्रकाराचा व्हिडिओ सोशल मीडियावर चर्चेत आला आहे. 'टेक्नोफोरा २०२६' या वार्षिक तांत्रिक महोत्सवाचा हा कार्यक्रम होता. इलेक्ट्रॉनिक्स आणि इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअरिंग विभागाकडून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कॉमेडियन रजत सूद यांच्या सादरीकरणादरम्यान



एका विद्यार्थ्याच्या वक्तव्यामुळे हा प्रकार घडल्याचे सांगितले जात आहे. व्हायरल व्हिडिओशी संबंधित वृत्तांनुसार, विभागप्रमुख असल्याचे सांगितले जाणारे एक प्राध्यापक विद्यार्थ्यांशी संवाद साधत असताना प्रेक्षकांमधील एका विद्यार्थ्याने 'गोलमाल' चित्रपटातील प्रसिद्ध संवादाचा संदर्भ देत जल्दी बोल, कल सुबह पनवेल निकलना है असे म्हटले. त्यावर प्राध्यापकांनी विद्यार्थ्याला उत्तर दिले. यानंतर प्राध्यापकांनी त्या विद्यार्थ्याला मंचावर बोलावले. व्हिडिओमध्ये प्राध्यापक विद्यार्थ्याला जाब विचारताना आणि त्याला ताकीद देताना दिसत आहेत.

# शिवार फेरी २०२६ मध्ये हातुर्णाच्या डॉ.पंजाबराव ठाकरे तंत्र विद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरूड** – कृषी विद्यापीठ अकोला येथे स्व.पंजाबराव ठाकरे कृषी तंत्र विद्यालय हातूर्णा येथील प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. खरीप हंगामातील पीक पद्धती व पीक व्यवस्थापन विषयी नवनवीन तंत्रज्ञान विद्यापीठाद्वारे लोकांना प्राप्त व्हावे, या उद्देशाने ही शिवार फेरी आयोजित केलेली होती. याप्रसंगी कृषी विद्यापीठ अकोला कुलगुरु डॉ.शरद गडाख, विस्तार शिक्षण




संचालक डॉ.डी.बी.उंदीरवाडे, अमरावतीच्या जैव तंत्रज्ञान महाविद्यालय प्राचार्य डॉ.चिखले, हातूर्णाच्या कृषी तंत्र विद्यालयाचे प्राचार्य श्याम ताथोडे उपस्थित होते तसेच सहयोगी अधिष्ठाता यांच्या समवेत छायाचित्र काढण्याची संधी उपलब्ध झाली. यानिमित्ताने विद्यार्थ्यांना बऱ्याच नवीन बाबी शिकायला मिळाल्या.

# मुंबई, पुण्यातील निवासी अतिक्रमणे होणार अधिकृत

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – मुंबई शहर, मुंबई उपनगर, पुणे तसेच पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील शासकीय जमिनीवरील १ जानेवारी २०११ पर्यंत झालेली निवासी अतिक्रमणे अधिकृत करण्यात येणार आहेत. त्यासाठी सर्वकष धोरण निश्चित करण्यासाठी कोकण विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती गठित करण्यात आली आहे. समितीला




पुढील तीन महिन्यांत आपला अंतिम आणि स्पष्ट शिफारशींसह अहवाल सादर करण्याची मुदत देण्यात आली आहे.

राज्यभरातील शासकीय जमिनीवरील १ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे नियमित करण्याबाबत महसूल विभागाने २५ मार्च २०२६ रोजी धोरणात्मक निर्णय घेतला होता. मात्र, या निर्णयातून मुंबई, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्र वगळण्यात आले होते. झोपडपट्टी प्राधिकरणाच्या प्रतिनिधींचा समावेश कोकण विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीत सदस्य म्हणून मुंबई शहर, मुंबई उपनगर, पुणे जिल्हाधिकारी, मुंबई आणि पुणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे प्रतिनिधी, मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे प्रतिनिधी, मुंबई, मुंबई उपनगर आणि पुणे येथील अधीक्षक, भूमि अभिलेख यांचा समावेश आहे.

# शेतजमिनीच्या दस्त नोंदणीसाठी १० हजारांची लाच मागितली

## दुय्यम निबंधकासह खासगी व्यक्ती रंगेहात जाळयात

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नाशिक** – शेतजमिनीच्या खरेदी दस्ताची नोंदणी करून देण्यासाठी १० हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दुय्यम निबंधकासह एका खासगी व्यक्तीला रंगेहात पकडले. तडजोडीनंतर ४ हजार २०० रुपयांची लाचेची



रक्कम स्वीकारताना ही कारवाई करण्यात आली.या कारवाईत प्रमोद लक्ष्मण वामन (५७, दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक ४, रा. रिद्धिसिद्धी अपार्टमेंट, ए विंग, दुसरा माळा, २०२, लोकमान्य नगर, नाशिकरोड, नाशिक) आणि खासगी व्यक्ती योगेश बाळू डांगले (३८, रा.पिंपळास रामाचे, ता.निफाड, जि.नाशिक) अशी संशयितांची नावे आहेत. शेतजमिनीच्या दस्त नोंदणीसाठी लाचेची मागणी मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे वकील असून त्यांच्या पक्षकाराच्या शेतजमिनीच्या खरेदी दस्ताची नोंदणी करून देण्यासाठी दुय्यम निबंधक प्रमोद वामन यांनी १० हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे.

## स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालयाच्या विद्यार्थीनींचा संघ

# व्हॉलीबॉल खेळात तालुका उपविजयी

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरूड** – युवक व सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अमरावती यांच्या संयुक्त आयोजित एन.जी.मोघे कनिष्ठ महाविद्यालय शे.घाट येथे १४, १७, १९ वयोगटातील तालुकास्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा २२ आणि २३ सप्टेंबर या दोन दिवस कालावधीत पार पडल्या.

यात तालुक्यातून अनेक संघानी सहभाग घेतला. वयोगट १९ वर्ष



मुलींच्या स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय वरुड या शाळेने अंतिम सामन्यात जनता विद्यालय शेघाट सोबत उपविजय स्थान मिळवता आला. याबद्दल आयोजकांनी ट्रॉफी प्रदान करुन सन्मान केला.

यावेळी मुख्याध्यापक विजय आडे, पर्यवेक्षिका माधुरी मेश्राम तसेच शारीरिक शिक्षक संदीप ठाकरे व मार्गदर्शक शिक्षक सुनील वटके आणि सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी या उपविजयी विद्यार्थीनींचे अभिनंदन केले.

## बीबीए विभागात चार्टर्ड अकाऊंटन्सी क्षेत्रातील

# करिअर संधींबाबत एकदिवसीय कार्यशाळा

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरूड** – स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स आणि द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने बीबीए विभागा तर्फे करिअर इन चार्टर्ड अकाऊंटन्सी या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन नुकतेच करण्यात आले.



कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.प्राची ठाकरे, अध्यक्षस्थानी होत्या. प्रमुख वक्ते म्हणुन सीए डॉ.सतीशकुमार गुप्ता तसेच बीबीए विभागप्रमुख प्रा.चेतन गणोरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बीबीए विभागप्रमुख प्रा.चेतन गणोरकर यांनी केले. त्यानंतर प्रमुख वक्ते सीए डॉ.सतीश कुमार गुप्ता यांनी करिअर इन चार्टर्ड अकाऊंटन्सी या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. चार्टर्ड अकाउंटन्सी अभ्यासक्रमासाठी आवश्यक पात्रता, अभ्यासक्रमाची रचना, परीक्षा पद्धती, तयारीचे नियोजन तसेच या क्षेत्रातील उपलब्ध करिअरच्या




विविध संधी याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. भविष्यातील उज्ज्वल करिअरसाठी विद्यार्थ्यांनी सीए या व्यावसायिक अभ्यासक्रमाचा गांभीर्याने विचार करावा, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्या डॉ.प्राची ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना सातत्य, मेहनत आणि योग्य नियोजनाच्या माध्यमातून आपल्या ध्येयाकडे वाटचाल करण्याचे मार्गदर्शन केले. चार्टर्ड अकाउंटन्सी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी त्यांचा योग्य प्रकारे लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमासाठी इयत्ता १२ वीत शिकत असलेल्या परिसरातील महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे संचालन प्रा.प्रफुल्ल बोहरूपी यांनी केले. कार्यशाळेला बीबीए विभागाचे प्रा.सौरभ आकोटकर, प्रा.आशिष शहाणे, प्रा.तेजस दळवी आणि प्रा.अस्मिता गेडाम यांची उपस्थिती लाभली तसेच विद्यार्थ्यांनीही कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रम समन्वयक प्रा.प्रफुल्ल बोहरूपी यांनी केले.

# संपादकीय

**{ ती आपल्या मनाच्या लढाऊ वृत्तीत असते. }**

## गिलगिट-बाल्टिस्तान : फाळणीपासून आजच्या असंतोषापर्यंतचा गुंतागुंतीचा प्रवास

१९४७ च्या फाळणीनंतर भारतीय उपखंडात निर्माण झालेले अनेक प्रश्न काळाच्या ओघात मार्गी लागले; परंतु जम्मू-काश्मीरचा प्रश्न मात्र आजही दक्षिण आशियाच्या राजकारणातील सर्वात संवेदनशील विषय ठरला आहे. या प्रश्नाच्या केंद्रस्थानी असलेला गिलगिट-बाल्टिस्तान हा प्रदेश केवळ भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचा नाही, तर ऐतिहासिक, सामरिक आणि आर्थिक दृष्ट्याही अत्यंत संवेदनशील आहे. अलीकडील काळात या भागात वाढलेले आंदोलन, स्थानिक असंतोष, आर्थिक अडचणी आणि घटनात्मक हक्कांच्या मागण्या यामुळे हा प्रदेश पुन्हा चर्चेत आला आहे. भारत या प्रदेशाला जम्मू-काश्मीरचा अविभाज्य भाग मानतो, तर पाकिस्तान अनेक दशकांपासून त्याचे स्वतंत्र प्रशासकीय व्यवस्थापन करत आहे. या पार्श्वभूमीवर या प्रदेशाचा इतिहास, वर्तमान आणि भविष्यातील परिणाम समजून घेणे आवश्यक ठरते.

**फाळणीची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

ब्रिटिश भारताच्या फाळणीवेळी जम्मू-काश्मीर हे संस्थान महाराजा हरिसिंह यांच्या अधिपत्याखाली होते. संस्थानाने सुरुवातीला स्वतंत्र राहण्याचा प्रयत्न केला. मात्र ऑक्टोबर १९४७ मध्ये पाकिस्तानकडून आदिवासी लष्करी गटांच्या आक्रमणानंतर परिस्थिती बदलली. या आक्रमणामुळे श्रीनगर धोक्यात आल्यानंतर महाराजा हरिसिंह यांनी भारताशी विलिनीकरणाचा करार केला आणि त्यानंतर भारतीय सैन्याने कारवाई सुरू केली. याच काळात गिलगिट परिसरात ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील स्थानिक स्काउट्सनी महाराजांच्या प्रशासनाविरुद्ध बंड केले. काही दिवसांतच या भागात पाकिस्तानचा प्रभाव प्रस्थापित झाला. त्यानंतर युद्धबंदी रेषा निश्चित झाली आणि जम्मू-काश्मीरचा काही भाग भारताच्या, तर काही भाग पाकिस्तानच्या नियंत्रणाखाली राहिला. गिलगिट-बाल्टिस्तान हा पाकिस्तानच्या नियंत्रणाखाली राहिलेल्या प्रदेशांपैकी सर्वात मोठा भाग ठरला.

**भौगोलिकदृष्ट्या अनमोल प्रदेश**

गिलगिट-बाल्टिस्तान हा जगातील काही सर्वोच्च पर्वतरांगांनी वेढलेला प्रदेश आहे. हिमालय, काराकोरम आणि हिंदूकुश या तीन पर्वतरांगा येथे एकत्र येतात. जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वोच्च शिखर के-२ याच भागात आहे. सियाचीन हिमनदीजवळील सामरिक स्थान, चीनच्या शिनजियांग प्रांताशी जोडणारा काराकोरम महामार्ग आणि अफगाणिस्तानच्या वाखान कॉरिडॉरच्या जवळचे स्थान यामुळे हा प्रदेश लष्करी आणि व्यापारीदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा ठरतो. याच मार्गातून चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर जातो. चीनच्या बेल्ट अँड रोड उपक्रमातील हा एक महत्त्वाचा प्रकल्प मानला जातो. त्यामुळे गिलगिट-बाल्टिस्तान हा केवळ भारत-पाकिस्तान प्रश्नापुरता मर्यादित राहत नाही, तर चीनच्या व्यापक आर्थिक आणि सामरिक हितसंबंधांशीही जोडला जातो.

**घटनात्मक स्थिती आणि स्थानिकांचा प्रश्न**

पाकिस्तानने दीर्घकाळ या प्रदेशाला औपचारिक प्रांतीय दर्जा दिला नव्हता. वेगवेगळ्या प्रशासकीय आदेशांद्वारे येथे शासन चालविले गेले. स्थानिकांना पूर्ण घटनात्मक प्रतिनिधित्व, संसदेत समान अधिकार आणि सर्वोच्च न्यायिक संरक्षण यांसारख्या मुद्द्यांवर सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत. स्थानिक संघटना अनेक वर्षांपासून अधिक राजकीय अधिकार, नैसर्गिक संसाधनांवरील स्थानिक हक्क, रोजगार आणि पारदर्शक प्रशासनाची मागणी करत आहेत. काही गट पूर्ण प्रांतीय दर्ज्याची मागणी करतात, तर काही गट संयुक्त राष्ट्रांच्या ठरावांच्या अनुषंगाने व्यापक काश्मीर प्रश्नाशी हा विषय जोडून पाहतात.


---

✻ कार्यकर्त्यातून लोकसेवक घडवणारे नेतृत्व — ❝ — ✻ वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्याची मनोगते

# बोले तैसा चाले त्यांची वंदावी पाऊले...

आ आज बाबासाहेब यांचा वाढदिवस मोर्शी-वरुड मतदारसंघाचे भाग्यविधाते, माजी आमदार नरेशचंद्र उर्फ बाबासाहेब ठाकरे यांचा वाढदिवस. या निमित्ताने त्यांच्या कार्याचा आढावा घेणे म्हणजे विकासाची गाथाच लिहिणे आहे. तब्बल ५० वर्षांहून अधिक काळ त्यांनी या मतदारसंघावर आपल्या कामाच्या जोरावर अधिराज्य गाजवले आहे.

बाबासाहेबांचे व्यक्तिमत्व म्हणजे 'बोले तैसा चाले' या संतवचनाचा प्रत्यय. ते जे बोलतात तेच करतात. स्पष्टवक्तेपणा हा त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव. राजकारणात आज वचनाला किंमत राहिली नाही, अशा काळात शब्दाला जागणारा, दिलेला शब्द पाळणारा नेता म्हणुन संपुर्ण अमरावती जिल्हा त्यांच्याकडे आदराने पाहतो. आज ज्यांच्या नेतृत्वाने आमदार, खासदार, जि.प.सदस्य घडले, ते नेतृत्व म्हणजे बाबासाहेब.



**शेतकऱ्याच्या घरातला नेता**

मुळ शेतकरी असलेल्या बाबासाहेबांना शेतकऱ्यांच्या दुःखाची खरी जाणीव आहे. संत्रा उत्पादक शेतकरी जेव्हा अडचणीत येतो, भाव पडतो, तेव्हा धावून जाणारा, बाजार समितीत शेतकऱ्याला न्याय मिळवून देणारा नेता म्हणून त्यांची ओळख आहे. अप्पर वर्धा डायव्हर्शनचे ते खरे प्रणेते आहेत. मोर्शी-वरुड तालुका दुष्काळमुक्त व्हावा, शेतकऱ्याच्या शेतात बारमाही पाणी यावे यासाठी त्यांनी विधानसभेत आणि बाहेर सातत्याने लढा दिला. आज जो काही अप्पर वर्धेचा लाभ आपल्या भागाला होतोय, त्याचे श्रेय त्यांच्या दूरदृष्टीला जाते.

**बाबासाहेबांनी आणलेले विकास प्रकल्प**

अप्पर वर्धा प्रकल्प तर केलाच, त्यामध्ये काही लोकांनी मूळ महत्वाकांक्षी योजना बंद पाडण्याचा प्रयत्न केला, तरीही त्यांनी ती योजना तडीस नेली. त्यासोबतच त्यांनी आलोडा-ऋषीबाबा प्रकल्प, सावंगा-लोणी धवलगिरी प्रकल्प, पाकणाला-बेनोडा सर्कल प्रकल्प, चांदस-दाभी प्रकल्प असे अनेक बंधारे व जलसिंचन प्रकल्प आणले. वरुड मोर्शी दोन्ही तालुक्यात २४तास सिंचन रहावं.

सोबतच ग्रामीण रुग्णालय वरुड व मोर्शी येथे आणले, आमनेर प्राथमिक आरोग्य केंद्र त्यांनीच मंजूर करून आणली. राजुरा बाजार व १० गावे पाणीपुरवठा योजना त्यांनीच केली. संपूर्ण वरुड-मोर्शी क्षेत्रात ज्ञानेश्वर दाभाडे जिल्हा परिषद अध्यक्ष असताना यशवंत ग्रामसमृद्धी योजनेतून प्रत्येक गावामध्ये सिमेंट रस्ते घडवून आणले. अनेक गावांमध्ये सभागृह बांधलेत, सेवा सहकारी कार्यालयाचे बांधकाम केले.

**सहकारातील भिष्माचार्य**

एका संस्थेपुरते मर्यादित न राहता दोन्ही तालुक्यातील सहकार चळवळ त्यांनी जिवंत ठेवली. अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अनेक वर्षे संचालक म्हणून त्यांनी शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा सुरळीत ठेवला. खरेदी-विक्री संघ, बाजार समिती मोर्शी-वरुड, सातपुडा सहकारी सोसायटी अशा अनेक संस्थांमध्ये त्यांनी कायम घर केले नाही तर त्या संस्थांना नफ्यात आणून दाखवले. विदर्भातील नावाजलेल्या श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे ते उपाध्यक्ष म्हणुन शिक्षण क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान आहे.

**रोजगाराचे दाते**


मोर्शी-वरुड संघात विकासाची गंगा आणण्याचे काम बाबासाहेबांनी आमदार असताना केले. त्यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे अनेक गरीब घरच्या मुलांना नोकरीसाठी मदत करणे. आज दोन्ही तालुक्यात शेकडो मुले त्यांच्या शिफारशीने, कोणतीही अपेक्षा न ठेवता, फुकट नोकरीला लागली आहेत. 'माणूस कमवा' हे त्यांचे तत्व आहे. राजकारणात अनेक आमदार आले आणि गेले, पण सत्ता नसतानाही लोकांच्या सुख-दुःखात सहभागी होणारा नेता म्हणुन बाबासाहेबांची ओळख आजही कायम आहे. अशा या लोकराजास वाढदिवसाच्या लक्ष लक्ष शुभेच्छा.



**शेषराव नर्मदा गोपाळ कडू**
**वरुड मोबा.९९२३९८८७३४**

---

# सहकारमहर्षी बाबासाहेब उर्फ नरेशचंद्रजी ठाकरे : सहकाराचे आधारवड



**अमरावती जिल्ह्यात सहकार क्षेत्र म्हटले की, पहिले डोळ्या समोर येणारे नाव म्हणजे आदरणीय बाबासाहेब उर्फ नरेशचंद्रजी ठाकरे. आज त्यांचा वाढदिवस. या निमित्ताने त्यांनी केलेले कार्य समोर येणे म्हणजे एका जिवंत विद्यापीठाला उजाळा देण्यासारखे आहे.**



**बबलु उर्फ नरेंद्र शेषराव पावडे**
**सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती वरुड**

बाबासाहेबांना मी लहानपणापासून जवळून पाहिले आहे. त्यांचे एक वैशिष्ट्य मला नेहमी पहायला मिळाले ते बाहेर जसे बोलतात तसेच घरीही बोलतात. दुटप्पीपणा त्यांच्या बोलण्यात रक्तातच कधीच दिसून आला नाही. स्पष्ट वक्ते म्हणुन त्यांची संपूर्ण जिल्ह्यात ख्याती आहे. जे बोलतात ते करतात दिलेला शब्द कधीही फिरवत नाही जे मनात तेच ओठावर, हाच त्यांच्या लोकप्रियतेचा खरा मंत्र आहे.

सहकार म्हणजे काय? सहकारातील सर्व संस्था कशा विकसीत करुन शेतकरी हित जोपासले जाते, हे बाबासाहेबांनी ज्या संस्थेवर लोकप्रतिनिधी म्हणुन काम केले त्या संस्थेचा विकास पाहिल्यास आपल्या लक्षात येईल बाबासाहेबांसोबत एकदा जोडलेला माणुस कधीही न तुटणे हे बाबासाहेबांनी संबंध काम या माध्यमातून आयुष्यभर जपले. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ते ४० वर्ष संचालक व एक टर्म अध्यक्ष राहिले. सहकारात त्यांची पकड आजही घट्ट आहे. वरुड तालुक्यातील खरेदी-विक्री संघ असो, कृषी उत्पन्न बाजार समिती असो सातपुडा जिनिंग प्रेसिंग असो किंवा अनेक गावातील विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या असोत, या प्रत्येक ठिकाणी त्यांचे वर्चस्व सुरुवातीपासून ते आजपर्यंत टिकून आहे

बाबासाहेब हे स्वतः एक सधन शेतकरी आहेत, त्यामुळे शेतकऱ्याची दुःख, शेतकऱ्यांच्या व्यथा त्यांना जवळुन माहित आहे. शेतकऱ्यांविषयी त्यांना कळवळा असून आमदार झाले तेव्हा जनतेनी दिलेल्या एका संधीमध्ये ५ वर्षाचे काळात वरुड तालुक्यात शेतकऱ्याच्या शेतीकरिता मुबलक पाणी उपलब्ध व्हावे, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी, हा शेतकरी हिताचा उद्देश डोळ्या समोर ठेवून ५ सिंचन प्रकल्प शासनाकडून मंजूर करून आणून पूर्ण केले त्यांनी मोठ्या ताकतीने मंजूर करुन आणलेला वर्धा डायव्हर्शन सारखा प्रकल्प आज शेतकऱ्यांसाठी वरदान ठरला शेतकऱ्यांकरिता सिंचनाच्या योजना आणण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम आजही लोक विसरले नाहीत. शेतकऱ्याच्या मुलांची शैक्षणिक पात्रता पाहून त्यांना बँक सेवा सहकारी संस्थेचे सचिव म्हणून कुणा कडून एक रुपया न घेता शेतकऱ्यांच्या पोरांना नोकरीला लावले हे काम त्यांनी कुठलाही गाजावाजा न करता केले. आज मोर्शी-वरुड मतदारसंघातील शेकडो शेतकरी कुटुंबे मुलांचे नोकरीमुळे स्थिरस्थावर झाली आहेत म्हणुनच लोक त्यांना हक्काने 'गरिबांचा आधार' म्हणतात.

कार्यकर्त्यांतून लोकसेवक घडवणारे नेतृत्व बाबासाहेबांचे आणखी एक मोठे कार्य म्हणजे त्यांनी कितीतरी सामान्य कार्यकर्त्यांना घडवुन त्यांना चांगले लोकसेवक बनण्याचा धडा देऊन त्यांना मनापासून साथ देतात याचं जिवंत उदाहरण माझ्या घरात माझा आधी कोणीही राजकारणात नसताना मी त्यांचा सन १९९९ ते आजपर्यंतचा एक सामान्य कार्यकर्ता म्हणुन काम करत असताना मला कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती बनवणे, यावरुन त्यांचे कार्यकर्त्याविषयीचे राजकारणातील भावना दिसुन येते जनतेची सेवा हे त्यांचं जीवनातील प्राधान्य राहील असून राजकारणापेक्षा त्यांनी नेहमीच शेतकरी हित व सामाजिक कार्याला जास्त महत्व दिले. ते कार्यकर्त्यांना नेहमी सांगतात की, नशिबाच्या भरवशावर न राहता परिश्रम मेहनत करुन पुढे चालत राहून ताठ मानेने स्वाभिमानाने कसे जीवन जगता येईल? याचा पुरेपूर प्रयत्न करावा व हे त्यांनी स्वतःच्या जीवनातुन दाखवुन दिले. असे हे सहकारमहर्षी, आमचे नेते, स्पष्ट वक्ते, शेतकऱ्यांचे शेतमजुरांचे कैवारी असलेल्या बाबासाहेबांना वाढदिवसाच्या मनःपुर्वक आरोग्यदायी आनंददायी हार्दिक शुभेच्छा! त्यांना उदंड, निरोगी आयुष्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

---

# चतुरस्त्र, बहुआयामी आणि निर्भीड व्यक्तिमत्व बाबासाहेब

मोर्शी विधानसभा मतदारसंघात चतुरस्त्र, बहुआयामी आणि निर्भीड निर्भेळ व्यक्तिमत्व म्हणून नरेशचंद्र उपाख्य बाबासाहेब सर्वश्रृत आहेच. राजकीय आखाड्यात जय पराजया पलीकडचे व्यक्ती म्हणून त्यांची ओळख आहे. राज्य आणि सत्ता अधिकारी बनवते पण राजकीय स्थित्यंतर राजकीय परिस्थिती बदलवते याचा अनुभव आपणा सर्वांनाच थोड्या फार प्रमाणात असेलही परंतु मुळात समाजहिताच्या भावनेतून सार्वजनिक उपक्रमांचा वसा घेऊन राजकीय कारकीर्द घडते ती केवळ बाबासाहेबांचीच असू शकते. राजकारणा पलीकडचा माणूस म्हणुन किंवा राजकारणातला स्पष्टपणा आणि रोखठोक आपण सर्व अनुभवत आलो आहोत. चूक ते चूक आणि बरोबर ते बरोबर कोणताही विरोध न करता स्वीकारावा हा त्यांचा स्थायी भाव.आपल्या स्पष्ट बोलण्याने आणि आपल्या मतांवर ठाम असल्याचा आविर्भाव त्यांना उसना आणावा लागत नाही. ही त्यांच्या व्यक्तिमत्वा मधील खोच आहे. अर्थातच राजकारण करतांना गोड आणि गुळमुळीत बोलुन वेळ टाळणं अधिक फायद्याचे आणि गरजेचं असतं पण ते बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वात दिसत नाही. सहकार क्षेत्र असो किंवा सामान्य राजकारण व्यक्तिगत अस्तित्वाच्या लढाई पासून बाबासाहेब कोसो दूर आहेत.

राजकारण करतांना निस्वार्थ कार्यकर्ता आणि समाजधारणेची जाण असलेली माणसं ओळखण्यात त्यांचा हातखंडा आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून विदर्भातील शैक्षणिक चळवळीत आज त्यांचं नाव वलयांकित आहे. त्याच प्रमाणे वरुड तालुक्यात अगदी ग्रामीण भागातिल विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रम शिकून पुढे जावा, यावर त्यांचा कटाक्ष असतोच. वरुड तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणापासून ते विधानसभेमध्ये मोर्शी मतदार संघाचे लोकप्रिय आमदार व लोकप्रतिनिधी म्हणुन त्यांची कारकिर्द अभ्यासपूर्ण आहे. नव्या चळवळी उभारतांना नव्या रक्ताच्या युवा वर्गाने व नव्या नेतृत्वाने त्यांच्या कार्यशैलीच सिंहावलोकन करणे गरजेचे आहे.



राजकारण आणि समाजकारण यामधील समन्वय बाबासाहेबांना अवगत आहे. सर्वांच्या सुखदु:खात आपले पणाने सहभागी होऊन सामान्यपणे सर्वांशी हितगुज करणे, यातच त्यांच असामान्यपण लपलेलं आहे. वर्धा डायव्हर्शन सारखा जलसमृध्दीचा गोवर्धन उचलून धरण्याची क्षमता बाबासाहेबांमधला समाजहीत द्रष्टा माणुस उभा करतो. आपल्या संकल्पातून स्वत:ला विसरून हा प्रकल्प पूर्ण करण्याचा भगीरथ प्रयत्न आणि जिद्द अनेकांना प्रेरक अशीच आहे. अत्यंत बिकट समयी अनेकांना मदतीचा हात देणे, अनेक अपघातग्रस्ताची स्वत: व्यवस्था लावणे ही त्यांची कार्यशैली त्यांच्यामधील लोकनेता सिद्ध करते. माणूस म्हणून जगायला कोणतेही सिद्धांत पाठ करावे लागत नाही तर बाबासाहेबांसारखं जगावं लागतं आणि त्यांचे आदर्श उघड्या डोळ्यांनी अनुभवावे लागतात. आदरणीय बाबासाहेबाना वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा.

**सर्वेश पाटील ताथोडे**
**बेलोरा, ता.वरुड**
**मोबा.७४९८३७६४४७**

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय येथे

# प्रसिध्द मानसोपचारतज्ज्ञ डॉ.शिवा पुंडकर यांचे व्याख्यान

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**अमरावती** – येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय अमरावती येथे एन.एस.एस.दिनानिमित्त 'युवा व व्यसनमुक्ती' या विषयावर प्रसिध्द मानसोपचारतज्ञ डॉ.शिवा माया पुंडकर यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले.






यावेळी डॉ.शिवा पुंडकर यांनी युवकांमध्ये वाढणाऱ्या विविध प्रकारच्या व्यसनांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तंबाखू, मद्य व अमली पदार्थांसोबतच मोबाईल, सोशल मीडिया आणि ऑनलाईन गेमिंगच्या अतिवापरामुळे निर्माण होणाऱ्या सवयींबाबत विद्यार्थ्यांनी सजग राहण्याचे आवाहन त्यांनी केले. व्यसनाला नकार देत जीवनातील ध्येयाला होकार द्या, असा प्रेरणादायी संदेश देताना त्यांनी व्यसनाची सुरुवात अनेकदा कुतूहल, मित्रांचा दबाव, तणाव, भावनिक समस्या किंवा चुकीच्या संगतीतून होऊ शकते, असे स्पष्ट केले. मानसिक तणाव किंवा भावनिक अडचणी निर्माण झाल्यास त्या व्यक्तीशी संवाद साधणे आणि गरजेनुसार तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.व्याख्यानादरम्यान विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या प्रश्नांना डॉ.पुंडकर यांनी उत्तरे दिली. व्यसनमुक्त युवा पिढी ही सुदृढ समाजाच्या निर्मितीची महत्त्वपूर्ण पायरी आहे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कमलाकर पायास, राष्ट्रीय सेवा योजना महिला समन्वयक प्रा.डॉ.दीपाली डोळे व महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक व एन.एस.एस.स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# साहील वाकोडे मृत्यूप्रकरणी पालकांचे आझाद मैदानावर उपोषण

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – आयआयटी बॉम्बेचा विद्यार्थी साहील वाकोडे याच्या मृत्यूप्रकरणी दोषींवर कारवाई आणि अटकेच्या मागणीसाठी त्याच्या पालकांनी गुरुवारी संध्याकाळपासून आझाद मैदानावर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. तत्पूर्वी, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दूरध्वनीवरून वाकोडे कुटुंबाशी संवाद साधून त्यांना पाठिंबा दर्शवला, तर नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडियाच्या (एनएसयूआय) कार्यकर्त्यांनी पवईतील आयआयटी बॉम्बेच्या मुख्य प्रवेशद्वारावर तीव्र निदर्शने केली. याप्रकरणी पोलिसांनी अनेक आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. साहीलच्या पालकांनी सुरुवातीला आयआयटी बॉम्बेबाहेर आंदोलन करण्याचे नियोजन केले होते. मात्र, पोलिसांनी त्यांना भांडुप पोलीस ठाण्यात सुमारे दीड तास रोखून ठेवले. त्यानंतर त्यांना सह्याद्री अतिथीगृहावर नेण्यात आले.

# तृणमूल : निर्णयासाठी किती वेळ लागणार

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




***नवी दिल्ली*** – ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस (टीएमसी) पक्षाचे नाव आणि 'जोडाफूल' (फुलं अनब गवत) या निवडणूक चिन्हावरून दोन गटांत निर्माण झालेल्या वादावर अंतिम निर्णय घेण्यासाठी किती वेळ लागेल, याची स्पष्ट कालमर्यादा सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी निवडणूक आयोगाकडून मागताना शिवसेना पक्षाबाबत झालेल्या विलंबाचा दाखला दिला आहे.

तृणमूल काँग्रेस पक्षाच्या मूळ नावावर आणि चिन्हावर कुणाचा हक्क आहे, याचा अंतिम निर्णय घेण्यासाठी किती वेळ लागेल, याची माहिती २५ सप्टेंबरपर्यंत सादर करण्याचे निर्देश आयोगाचे ज्येष्ठ वकील डी. एस. नायडू यांना दिले असून, पुढील सुनावणी २८ सप्टेंबर रोजी होणार आहे. अंतिम निर्णयासाठी साधारण किती वेळ लागेल हे सांगा. दोन्ही पक्षांना त्यांचे म्हणणे मांडण्यास रास्त वेळ मिळावा आणि तुम्हालाही विचारपूर्वक निर्णय घेता यावा... पण या प्रक्रियेला खूप जास्त वेळ लागू नये,' असे सरन्यायाधीशांनी नमूद केले.

# जनगणना : शनिवारी 'संक्षिप्त घरयादी'बाबत प्रशिक्षण

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

***अमरावती*** – जनगणना २०२७ च्या दुसऱ्या टप्प्याच्या पूर्वतयारीसाठी जिल्ह्यात संक्षिप्त घरयादी आणि गणना गट तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. हे काम अधिक प्रभावीपणे करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे शनिवारी, २६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता अर्धदिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

संक्षिप्त घरयादी हा जनगणनेचा एक अत्यंत मूलभूत दस्तऐवज असल्याने त्यात कोणत्याही त्रुटी राहू नयेत, यासाठी हे विशेष प्रशिक्षण आयोजित केले आहे. जनगणना संचालनालयाचे (मुंबई) सहाय्यक संचालक प्रविण भगत आणि ऋषीकेश पाथरे हे उपस्थित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणार आहेत. जिल्ह्यातील सर्व ग्रामीण व शहरी क्षेत्रातील चार्ज जनगणना अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी, नायब तहसीलदार, कार्यालय अधीक्षक, जनगणना लिपिक, तांत्रिक सहाय्यक तसेच महानगरपालिकेचे शहर जनगणना अधिकारी आणि झोनचे सर्व चार्ज अधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे. जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी अमरावती, संतोष काकडे यांनी सर्व संबंधितांना प्रशिक्षण आदेश जारी केले असून, या प्रशिक्षणास सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी वेळेवर उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# ५ राज्यांच्या निवडणुकीत भाजपचा सर्वाधिक खर्च

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

* एकट्या बंगालमध्ये खर्च केले २८६.९९ कोटी रुपये, खर्च विवरणपत्रावरून माहिती उघड



***नवी दिल्ली*** – भारतीय जनता पक्षाने एकट्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत २८६.९९ कोटी रुपये खर्च केले आहेत. हा खर्च काँग्रेस पक्षाने यावर्षी झालेल्या पाच राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील निवडणुकांमध्ये केलेल्या एकूण २४८.५५ कोटी रुपयांच्या खर्चापेक्षा अधिक आहे, अशी माहिती निवडणूक आयोगाकडे सादर केलेल्या खर्च विवरणपत्रावरून समोर आली आहे.

पश्चिम बंगाल, आसाम, केरळ, तमिळनाडू आणि पुद्दुचेरी या पाच राज्यांमधील भाजपच्या एकूण ५२९.३८ कोटी रुपयांच्या निवडणूक खर्चापैकी निम्म्याहून अधिक खर्च एकट्या पश्चिम बंगालमध्ये झाला आहे. भाजपने बंगालमध्ये सामान्य प्रचारावर २१७.१६ कोटी रुपये आणि उमेदवारांवर ६९.८३ कोटी रुपये खर्च केले. पश्चिम बंगालमध्ये भाजपने तृणमूल काँग्रेसला पराभूत करत पहिल्यांदाच सत्ता स्थापन केली. घोषित झालेल्या २९३ जागांपैकी भाजपने २०७ जागा जिंकल्या, तर तृणमूल काँग्रेसला ८० जागा मिळाल्या.

केरळमधील चित्र वेगळे पक्षांनी जाहीर केलेल्या खर्चाच्या आधारे केरळमध्ये वेगळी परिस्थिती दिसून येते. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीने माकपच्या नेतृत्वाखालील डाव्या लोकशाही आघाडीचा पराभव केला. यामध्ये काँग्रेसने ६३ आणि माकपने २६ जागा जिंकल्या, तर भाजपला ३ जागा मिळाल्या. काँग्रेसने आपल्या मुख्यालय आणि राज्य युनिटद्वारे केरळमध्ये १०५.३४ कोटी रुपये खर्च केले, जे भाजपच्या ८२.६७ कोटी रुपयांपेक्षा जास्त आहेत. काँग्रेसच्या खर्चापैकी ७१.३० कोटी रुपये सामान्य प्रचारावर आणि ३४.०५ कोटी रुपये उमेदवारांवर खर्च झाले.

भाजपने केरळमध्ये सामान्य प्रचारावर ५४.९३ कोटी रुपये आणि उमेदवारांवर २७.७४ कोटी रुपये खर्च केल्याचे अहवालात म्हटले आहे.

# दुष्काळाच्या चर्चेसाठी अधिवेशन बोलवा! उद्धव ठाकरे यांची मागणी

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**मुंबई** – दुष्काळामुळे हवालदिल झालेला शेतकरी मदत कधी मिळणार, याकडे डोळे लावून बसला आहे.

डबल इंजिन सरकारची केंद्रात आणि राज्यात सत्ता आहे. मात्र हे डबल इंजिन सरकार कर्जमुक्ती करू, दोन दिवसांत दुष्काळ जाहीर करू, अशा वाफा सोडत आहे, अशी टीका करत दुष्काळाच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी विधिमंडळाचे – विशेष अधिवेशन बोल–ावण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरूवारी येथे केली.

राज्यातील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा आपण स्वतः करणार असल्याची माहिती ठाकरे यांनी दिली. राज्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे यांनी गुरुवारी 'मातोश्री' निवासस्थानी पत्रकार परिषदेत बोलताना राज्य सरकारवर हल्ला चढवला.

'गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्र सातत्याने नैसर्गिक संकटांचा सामना करत आहे. गेल्या वर्षी मराठवाड्यात अतिवृष्टीने धुमाकूळ घातला होता, तेव्हा जमिनी खरडून गेल्या होत्या. खरडून गेलेल्या जमिनीसाठी हेक्टरी साडेतीन लाख रुपये जाहीर केले होते. परंतु, या ३१ हजार कोटींपैकी खरोखर किती मदत प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या हातात पोहोचली आहे, याची माहिती महाराष्ट्राला मिळायला हवी,' असे ठाकरे म्हणाले.

संपूर्ण पीककर्ज माफ करा महाराष्ट्रातील दुष्काळसदृश परिस्थितीची तीव्रता वाढत असताना निकषांचा आणि केंद्राच्या मदतीचा बहाणा न करता किमान २० जिल्ह्यांतील १०० तालुक्यांत तातडीने दुष्काळ जाहीर करा. शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये रोख मदत द्या आणि संपूर्ण पीककर्ज माफी करा, अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी यावेळी केली.

आनंद सांस्कृतिक गणेश मंडळात

# तब्बल १०२ रक्तदात्यांनी बजावले सामाजिक कर्तव्य

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

***वरुड*** – शहरातील मोठा भाजीबाजार परिसरातील आनंद सांस्कृतिक गणेश मंडळ वरुड पोलीस स्टेशन आणि रक्तवीर बहुउद्देशीय संस्थेंच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून तब्बल १०२ गणेशभक्तांनी रक्तदान करुन आपले सामाजिक कर्तव्य पार पाडले. रस्ते सुरक्षेचा संदेश देत सर्व रक्तदात्यांना मंडळाच्या वतीने भेट म्हणुन हेल्मेट आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. ऑपरेशन कवच या विशेष उपक्रमांतर्गत आयोजित या शिबिरात युवक, महिलांसह पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान केले. सामाजिक भान आणि गणेशोत्सवाचे औचित्य साधून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे शहरभरात कौतुक होत आहे. याच रक्तदान शिबिरादरम्यान विविध क्षेत्रात उलेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा आणि लोकप्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला. ठाणेदार अशोक जाधव यांच्या हस्ते नगरसेवक जीवन मालपे आणि किरण सावरकर यांचा सत्कार करण्यात आला तसेच ज्योती खंडेलवाल व प्रांजली गुर्जर यांच्या हस्ते नगरसेविका भारती माळोदे आणि सीमा कानुगो यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी मंडळाचे मार्गदर्शक मनोज गुल्हाणे यांच्या हस्ते ठाणेदार अशोक जाधव यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

या भव्य रक्तदान शिबिराच्या यशस्वितेसाठी आनंद सांस्कृतिक मंडळाचे मार्गदर्शक दिपक खंडेलवाल यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी विशेष पुढाकार घेतला तसेच ठाणेदार अशोक जाधव, सर्व पो–लीस अधिकारी कर्मचारी आणि रक्तवीर बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र शेटिये, नितीन गुर्जर, कैलास उपाध्याय, महेश बिलगये, पंकज लेकुरवाळे, डॉ.अरविंद बडघरे, लंकेश्वर उमक, सिक्की राजपूत, तुषार खेरडे, शैलेश धोटे, अजय राठोड, कपिंद्र शेटिये, शिवराज सुगावे, उन्नती राठोड, पूनम शेटिये आदींनी शिबीर यशस्वितेसाठी अथक परिश्रम घेतले.

डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयात

# रासेयो स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

***शेंदुरजनाघाट*** – येथील जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने २४ सप्टेंबर हा दिवस राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी तर प्रमुख वक्त्या म्हणुन कार्यक्रमाधिकारी डॉ.लुंबिनी गणवीर, मराठी विभाग प्रमुख डॉ.अविनाश धोबे, प्रमुख अतिथी म्हणून डॉ.दिनेश खेरडे, डॉ.प्रशांत चर्जन, डॉ.प्रवीण पवार उपस्थित होते. ग्रंथपाल डॉ.राजेश बोबडे यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाच्या आयोजनाची भूमिका मांडली. प्रमुख वक्ते यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्थापनेच्या दिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले.

डॉ.रा.ना.फुलारी यांनी अध्यक्षीय मनोगतातून विद्यार्थ्यांची सुसंवाद साधून राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व विद्यार्थ्यांना विविध उदाहरणांद्वारे पटवून दिले.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. गांजर गवत, प्लास्टिक व कचरा निर्मुलन यावेळी करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचे मेघा रजिस्ट्रेशन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# पैशांच्या व्यवहारावरुन वाद, शिवीगाळ अन दमदाटी करत मारहाण केल्याचा आरोप

## नालासोपाऱ्यात बहुजन विकास आघाडीच्या नगरसेवकासह ५ जणांवर गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नालासोपारा** – पैशांच्या व्यवहारावरून झालेल्या वादातून एका व्यक्तीला शिवीगाळ, दमदाटी करून शर्ट फाडत चापट मारल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी वसई-विरार महापालिकेतील बहुजन विकास आघाडीचे नगरसेवक अरशद जैनुल्ला चौधरी यांच्यासह पूजा राजकुमार सरोज (२५) आणि तिच्यासोबत असलेल्या






तीन तरुणी विरोधात पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार फैजान मुन्ना शेख यांच्या म्हणण्यानुसार, २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास सोपारा फाटा येथील मोहसीन अब्बासी वकिल यांच्या कार्यालयात ते उपस्थित होते. त्यानंतर पैशांच्या व्यवहारावरून वाद झाल्याने पूजाने शिवीगाळ व दमदाटी करत शेख यांचा शर्ट फाडून गालावर चापट मारल्याचा आरोप आहे. सोबतच मोबाईल हिसकावण्याचाही प्रयत्न झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. आपणांस मारहाण करण्यास प्रवृत्त केल्याचा आरोप, पोलिसांकडून प्रकरणाचा तपास सुरू दरम्यान, या घटनेनंतर मोहसीन यांनी डायल ११२ वर पोलिसांना माहिती दिली आणि पोलिसांना त्यांना बोलावून घेतलं.

# 'जर उद्यापर्यंत ज्ञानेश कुमारांनी राजीनामा नाही दिला तर..' अभिजित दिपकेंनी निर्णायक रणशिंग फुकलं

## आंदोलनाची तारीख, ठिकाण अन देशव्यापी दिशा सुद्धा सांगितली!

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – कॉकरोच जनता पार्टीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना राजीनाम्यासाठी शेवटचा अल्टीमेटम दिला आहे. जर ज्ञानेश कुमार यांनी उद्यापर्यंत (२६ सप्टेंबर) राजीनामा दिला नाही, तर २ ऑक्टोबरपासून देशव्यापी आंदोलन सुरू केले जाईल, असा इशारा संस्थापक अभिजीत दीपके यांनी दिला आहे. या आंदोलनाची सुरुवात मुंबईतून होईल, अशी घोषणा दिपके यांनी आपल्या ट्विटमधून केली आहे. सीजेपीने ज्ञानेश कुमार यांना ४८ तासांची मुदत दिली होती. एसआयआरच्या माध्यमातून देशातील १३ कोटींहून अधिक मते वगळण्यात आल्याचे सीजेपीने म्हटलं होतं. ज्यामुळे लोकांना त्यांच्या मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवण्यात आले.





**मुंबईतून देशव्यापी आंदोलनास सुरुवात**

अभिजित दिपके यांनी ट्विटमधून घोषणा केली आहे की, जर ज्ञानेश कुमार यांनी उद्यापर्यंत राजीनामा दिला नाही, तर सीजेपी २ ऑक्टोबर रोजी मुंबईतून देशव्यापी आंदोलनास सुरुवात करेल आणि ते आंदोलन भारतातील विविध शहरांपर्यंत नेईल. या गांधी जयंतीनिमित्त, आपण लोकशाही वाचवण्याचा संकल्प करूया. दुसरीकडे, काँग्रेस देशभरात आंदोलने आयोजित करण्याची योजना आखत आहे. दरम्यान, महाराष्ट्राच्या मतदार यादीच्या विशेष सघन पुनरीक्षणाविरोधात (एसआयआर) मुंबई उच्च न्यायालयात दोन याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. या याचिकांमध्ये एसआयआरची घटनात्मक वैधता, प्रक्रिया आणि अंमलबजावणी यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. याचिकाकर्त्यांचा दावा आहे की, दोन निवडणूक आयुक्तांचा आक्षेप असूनही मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी एसआयआरशी संबंधित १४ आदेश जारी केले. त्यांनी हे आदेश रद्द करण्याची आणि दाखल केलेले आक्षेप जाहीर करण्याची मागणी केली आहे.

**जम्मू आणि काश्मीर विधानसभेत काँग्रेस आमदारांचा एल्गार**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आज जम्मू आणि काश्मीर विधानसभेत गोंधळ उडाला. काँग्रेसचे आमदार 'ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा' असे लिहिलेले फलक घेऊन आले होते. दुसरीकडे, 'इंडियन एक्सप्रेस'मधील २३ सप्टेंबरच्या अहवालानंतर देशात निवडणूक आयोगातील बेबंदशाही समोर आली आहे. दोन निवडणूक आयुक्तांनी गेल्या १० महिन्यांत एसआयआरवर किमान १४ लेखी आक्षेप नोंदवले आहेत. यापैकी चार आक्षेप एकाच दिवशी नोंदवण्यात आले होते.

# पिंगुळीतील परप्रांतीयांचे २७५ बंगले चर्चेत : उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**कुडाळ** – दोडामार्ग तालुक्यातील सासोली येथील जमीन व्यवहाराचे प्रकरण गाजत असतानाच, पिंगुळी येथील जिल्हा परिषदेच्या मालकीच्या तलावाभोवती नियमांची पायमल्ली करून २७५ भूखंड विकसित केले जात असल्याचा आरोप माजी आमदार परशुराम ऊर्फ जी. जी. उपरकर यांनी केला आहे. जिल्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधी मिळून सिंधुदुर्ग जिल्हा परप्रांतीयांना विकायला काढत असल्याचा आरोप करत, या प्रकरणी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यासह कुडाळ तहसील कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला. विकासकांनी प्रकल्पाच्या जाहिरातींमध्ये तलावाचा वापर करून 'बोट क्लब', 'तरंगते उपाहारगृह' आदी सुविधांचे आमिष दाखवले जात असल्याचा आरोपही उपरकर यांनी केला. तलावाकडे जाणारा जुना रस्ता बंद करून खासगी सुरक्षारक्षक तैनात केल्याने स्थानिक शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याचे त्यांनी सांगितले.


# विसर्जन मिरवणुकीदरम्यान मोठी दुर्घटना

## कोल्हापुरात २१ फुटांची गणेशमूर्ती कोसळली

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**कोल्हापुर** – कोल्हापूर : दहा दिवसांच्या गणेशोत्सवानंतर आज, २५ सप्टेंबर रोजी राज्यभरात गणपती बाप्पाला निरोप दिला जात आहे. अशातच कोल्हापुरात गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान धक्कादायक घटना घडली. वाय. पी. पोवार नगर मंडळाची २१ फूट उंचीची गणेशमूर्ती मिरवणुकीत अचानक रस्त्यावर कोसळली. शुक्रवारी सकाळी सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास गोखले कॉलेज चौकात ही घटना घडली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणालाही





दुखापत झाली नसल्याची माहिती आहे. विद्युत तारेला स्पर्श झाल्यानंतर मूर्तीचा तोल गेला

मिळालेल्या माहितीनुसार, वाय. पी. पोवार नगर मंडळाची गणेशमूर्ती ट्रॅक्टर ट्रॉलीमधून विसर्जनासाठी नेण्यात येत होती. ही मूर्ती एका पायावर उभी होती आणि काहीशी झुकलेल्या अवस्थेत होती. गोखले कॉलेज चौकाजवळ मिरवणूक पोहोचल्यानंतर मूर्तीचा संपर्क रस्त्यावरील विद्युत तारेशी झाला. त्यानंतर काही क्षणांतच मूर्तीचा तोल गेला आणि ती थेट रस्त्यावर कोसळली.

# महाराष्ट्रातील महाविद्यालयांत पुन्हा विद्यार्थी निवडणुकांचे वारे घुमणार

## सरकारचा मोठा ॲक्शन प्लॅन तयार, आराखडा तयार करण्यासाठी १२ सदस्यांच्या समिती

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्रात पुन्हा एकदा विद्यार्थी निवडणुका घेण्यासंदर्भात हालचाली सुरु झाल्याची माहिती आहे. परिणामी आता निवडणुकीचा आराखडा तयार करण्यासाठी १२ सदस्यांच्या समितीला एका महिन्याची मुदत देण्यात आल्याचीही माहिती आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी आपल्या कॅम्पसमध्ये प्रतिनिधी निवडण्यासाठी शेवटचे मतदान १९९३ मध्ये केले होते. त्यामुळे आता तब्बल ३३ वर्षांनंतर, उच्च



शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थी निवडणुका कशा घेता येतील याचा अभ्यास करण्यासाठी १२ सदस्यांची समिती स्थापन करून राज्य सरकारने या निवडणुका पुन्हा सुरू करण्याच्या दिशेने एक नवीन पाऊल उचलले आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने गुरुवारी या समितीच्या नियुक्तीबाबतचा शासन निर्णय जारी केला. मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करेल, अशी माहिती आहे. समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी एका महिन्याचा कालावधी देण्यात आला आहे. या अहवालावरूनच निवडणूक प्रक्रिया राबवायची की नाही आणि ती कशी राबवायची, याबाबत पुढील निर्णय घेतला जाईल. निवडणुकीचा आराखडा तयार करण्यासाठी १२ सदस्यांच्या समितीला एका महिन्याची मुदत दरम्यान, ही समिती विविध घटकांशी चर्चा करेल आणि शांततापूर्ण, पारदर्शक व सर्वसमावेशक निवडणुकांसाठी उपाययोजना सुचवेल.

# मीरा-भाईंदरमध्ये बांधकामाच्या परवानग्या कशा?

## 'सेव्हन इलेव्हन' प्रकरणाची चौकशी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – मीरा-भाईंदर महानगरपालिकेतील नगररचना व विधी विभागाच्या कारभारावरून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. उच्च न्यायालयाचे आदेश अस्तित्वात असताना बांधकाम परवानग्या देण्यात आल्या का, संबंधित निर्णय कोणत्या अधिकाऱ्यांनी घेतले आणि त्यामागे कोणाचा दबाव होता, याची चौकशी करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. आमदार नरेंद्र मेहता यांच्याशी संबंधित प्रकरणे तसेच 'सेव्हन इलेव्हन' कंपनीच्या बांधकाम परवानगीचा मुद्दाही चौकशीच्या केंद्रस्थानी आहे. यासंदर्भात २४ सप्टेंबर रोजी विशेष बैठक घेऊन अहवाल मागवण्यात आला होता.

मंत्री सरनाईक यांनी प्रशासनाला, न्यायालयाच्या आदेशापेक्षा लोकप्रतिनिधी मोठे आहेत का, असा सवाल केल्याचे सांगण्यात आले.



**जाहीर नोटीस**

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७९९/२०२६** **ने.ता.२३/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती आशा वासुदेव दंदी, वय अं.६१ वर्ष, धंदा-गृहीणी

२) दिनेश वासुदेव दंदी, वय अं.४० वर्ष, धंदा- शेती

३) राकेश वासुदेव दंदी, वय अं.३८ वर्ष, धंदा- शेती

अर्जदार क्र.१ ते ३ रा.उदापुर, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत वासुदेव नामदेव दंदी, रा.उदापूर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२३/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२२/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# ग्रामीण नवसंशोधकांसाठी स्पर्धेचे आयोजन

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**अमरावती** – जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नवसंशोधक, पारंपरिक ज्ञानधारक आणि स्थानिक पातळीवर समस्या निवारण करणाऱ्यांसाठी युवकाना संधी उपलब्ध झाली आहे. 'हनी बी नेटवर्क', 'ग्यान' आणि 'गेटको' यांच्या वतीने हनी बी नेटवर्क क्रिएटिवीटी ॲण्ड इन्क्ल्यूसिव्ह इनोव्हेशन अवार्ड-इंडिया २०२५-२६ या राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नाविन्यपूर्ण शोध, शेतकऱ्यांचे प्रयोग, पारंपरिक ज्ञान आणि कारागिरांच्या कल्पकतेला राष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ मिळवून दिले जाणार आहे. स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक ५ लाख, द्वितीय ३ लाख आणि तृतीय २ लाख रूपये बक्षीस देण्यात येणार आहे. प्रोत्साहनात्मक पुरस्कारात १२ विजेत्यांना प्रत्येकी ५० हजाराचे पुरस्कार देण्यात येणार आहे. तसेच तज्ज्ञांकडून संशोधनाला व्यावसायिक व तांत्रिक पाठबळ मिळणार आहे. या स्पर्धेसाठी अर्ज करण्याची शेवटची मुदत दि.३१ ऑक्टोबरपर्यंत आहे. यासाठी gian.org या संकेतस्थळावर अर्ज करावे लागणार आहे.

# जिल्हा सामान्य रुग्णालयात 'पोषण आहार' आणि 'अनेमिया' जागृती

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**अमरावती** – शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालय येथे बालरोग कक्षामध्ये नुकताच 'राष्ट्रीय पोषण आहार मास' आणि 'अनेमिया' (रक्तक्षय) जागृती कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.अनिल बत्रा यांच्या मार्गदर्शनाखाली १६ सप्टेंबर २०२६ रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला बालरोगशास्त्र विभागाचे



सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ.मिलिंद सूर्यवंशी, जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या बालरोगतज्ज्ञ डॉ.सोनाली शिरभाते, अधिसेविका ललिता अटाळकर, तसेच आहारतज्ञ वैशाली चव्हाण व राजनंदिनी राठोड उपस्थित होत्या.

'हमारी अंगणवाडी, हमारी जिम्मेदारी' या घोषवाक्याला अनुसरून हा पोषण आहार मास साजरा केला जात आहे.पोषण आहार प्रदर्शनीचे आयोजन आणि मार्गदर्शन कार्यक्रमादरम्यान रुग्णालयात उपस्थित रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये आहाराविषयी जनजागृती करण्यात आली. आहारतज्ज्ञांनी रोजच्या जेवणात पोषण मूल्यांचे महत्त्व सांगतानाच जंक फूड टाळणे, लठ्ठपणावर नियंत्रण, कुपोषण निर्मूलन आणि लहान मुलांसाठी आईच्या दुधाचे (स्तनपान) महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

याप्रसंगी जनऔषधवैद्यकशास्त्र विभागाच्या प्राध्यापक व विभाग प्रमुख डॉ.कल्पना काळे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली 'पोषण आहार प्रदर्शनी' आयोजित करण्यात आली होती.

## गावगुंडाकडून पोलिस उपनिरीक्षकाची हत्या



(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**ठाणे** – ठाणे शहरातून एक अतिशय खळबळजनक बातमी समोर आली आहे. ठाण्यात गस्तीवरील पोलिस उपनिरीक्षकाची हत्या करण्यात आली आहे. पोलिस उपनिरीक्षक किसन भोईर असं मृत पोलिस उपनिरीक्षकाचे नाव असून गावगुंड आरोपी राजू वाल्मिकी याने ही हत्या केल्याची माहिती आहे. या घटनेनं पोलीस विश्वासह ठाणे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी राजू वाल्मिकी याला तात्काळ अटक करण्यात आली आहे.

# नागपूरमध्ये दोन गंभीर घटना! रस्ते अपघातात कामगाराचा मृत्यू तर दुसरीकडे अल्पवयीन मुलाची हत्या

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




**नागपूर** – नागपूर–अमरावती मार्गावरील गोंडखैरी टोल प्लाझाजवळ भीषण रस्ते अपघाताची घटना घडली. गुरुवारी रात्री साडेनऊच्या सुमारास ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या या अपघातात संजय कंपनीत काम करणाऱ्या एका कामगाराचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच बदिराजा फाउंडेशनच्या टीमने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर पोलिसांच्या मदतीने अपघातग्रस्त वाहने बाजूला करण्यात आली आणि वाहतूक सुरळीत करण्यात आली. या प्रकरणी संबंधित पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून, अपघात नेमका कशामुळे झाला याचा शोध घेतला जात आहे.

**जरीपटका परिसरात १६ वर्षीय मुलाची चाकूने हत्या**

दरम्यान, गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर नागपूर पोलीस हाय अलर्टवर असतानाच जरीपटका परिसरातील जिंजर मॉलजवळ एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलाची चाकूने वार करून हत्या करण्यात आली.आबिद शेख असे मृत मुलाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १४ ते १५ मुलांच्या टोळक्याने आबिदवर हल्ला केला. हल्ल्यानंतर गंभीर जखमी झालेल्या आबिदला उपचारासाठी नागपूरच्या इंदिरा गांधी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.





